नागरी क्षेत्रात स्मारके उभारण्यास परवानगी देण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०१५/प्र.क्र.२८८/नवि-२०
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- ०४ जानेवारी, २०१६.

संदर्भ:- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र स्मारक-३११३/प्र.क्र.३०८/२९, दिनांक २१.०८.२०१३.

प्रस्तावना:-

मा. मंत्री वित्त यांच्या सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पिय भाषणात राष्ट्रपुरूष/ थोर व्यक्ती / परमवीर चक्र प्राप्त वीर यांची नागरी क्षेत्रात स्मारके उभारण्याकरिता नियतव्यय चिन्हांकित करण्यात आला आहे.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र स्मारक-३११३/प्र.क्र.३०८/२९, दिनांक २१.०८.२०१३ अन्वये नगरपरिषद / नगरपालिका / महानगरपालिका कार्यक्षेत्रात स्मारक उभारण्याची कार्यवाही नगर विकास विभागाने करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यास अनुसरून राष्ट्रपुरूष / थोर व्यक्ती / स्वातंत्र्य सैनिक / इतिहास प्रसिध्द व्यक्ती / संत-महात्मे राजकारणातील प्रसिध्द व्यक्ती यांची स्मारके उभारण्याबाबतचे धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राष्ट्रपुरूष/ थोर व्यक्ती/ स्वातंत्र्य सैनिक/इतिहास प्रसिध्द व्यक्ती/ संत-महात्मे राजकरणातील प्रसिध्द व्यक्ती/ परमवीर चक्र प्राप्त वीर यांची स्मारके उभारण्याबाबत प्रत्येक जिल्ह्यात खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी:-

१)	**जिल्ह्याचे पालकमंत्री**	:	**अध्यक्ष**
२)	**जिल्हाधिकारी**	:	**सदस्य**
३)	**जिल्हा पोलीस आयुक्त / अधीक्षक**	:	**सदस्य**
४)	**जिल्ह्याचे नगररचनाकार**	:	**सदस्य**
५)	**अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग**	:	**सदस्य**
६)	**आयुक्त, महानगरपालिका / मुख्याधिकारी, नगरपालिका**	:	**सदस्य सचिव**

उपरोक्त सदस्यांव्यतिरिक्त अध्यक्षांच्या मान्यतेने अन्य सदस्यांनाही आवश्यकता असल्यास बैठकिस आमंत्रित करता येईल.

२. स्मारकास मान्यता देताना स्मारकाच्या प्रगतीचे टप्पे निश्चित करण्यात यावेत. प्रत्येक टप्प्यासाठी लागणारा निधी निश्चित करण्यात यावा व त्यानुसारच उभारणी होईल याकडे काटेकोरपणे लक्ष द्यावे. स्मारकाची उभारणी जास्तीत जास्त अडीच वर्षाच्या आत पूर्ण करण्यात यावी. स्मारके उभारताना सर्व शासकीय नियमांचे पालन करण्यात यावे. सदर समितीने मंजुरी दिलेल्या स्मारकाबाबतचा सर्वकष प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनास सादर करावा.

स्मारकाकरिता मंजुर करण्यात आलेल्या निधीचे विनियोजन प्रमाणपत्र शासनास विहीत कालावधीत सादर करावे. सदर स्मारकाच्या देखभालीची जबाबदारी संबंधित महानगरपालिका / नगरपलिकेची राहिल, याकरिता शासनाकडून कोणत्याही प्रकारे निधी उपलब्ध करण्यात येणार नाही.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०११२३८२३११२५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jayasingrao N Patil

Digitally signed by Jayasingrao N Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Jayasingrao N Patil
Date: 2016.01.04 17:44:01 +05'30'

(ज.ना पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा.सभापती, विधानपरिषद यांचे सचिव, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा.अध्यक्ष, विधानसभा यांचे सचिव, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. सर्व मा. मंत्री/मा.राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव,
६. मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, महाराष्ट्र राज्य,
७. मा.विरोधी पक्ष नेता, विधान सभा, महाराष्ट्र राज्य,
८. सर्व मा.विधान परिषद / विधान सभा सदस्य, महाराष्ट्र राज्य
९. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१०. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुबंई
१२. सर्व विभागीय आयुक्त
१३. आयुक्त, सर्व महानगरपालिका
१४. सर्व जिल्हाधिकारी
१५. सर्व पोलिस आयुक्त,
१६. सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक
१७. मुख्याधिकारी, नगरपालिका/ नगरपरिषदा (सर्व)
१८. निवडनस्ती / नवि-२०, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुबंई.